**प्रेस नोट** **दिनांक ०६/०४/२०२६**

**<u>आझाद मैदान पोलीस ठाण्याच्या पथकाने खुनाचा गुन्हा २४ तासात उघडकीस आणलेबाबत.</u>**

दिनांक ०४/०४/२०२६ रोजी १७.०४ वा. च्या पूर्वी टाटा गार्डन च्या आत, चर्चगेट स्टेशनच्या बाजुला, बस डेपो जवळ, मुंबई येथे इसम नामे राहुल पंजवानी उर्फ पंजाबी वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे यास कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणास्तव डोक्याला दगडाने जबर दुखापत करून जीवे ठार मारले होते. त्याबाबत दिनांक ०४/०४/२०२६ रोजी आझाद मैदान पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ९९/२०२६ कलम १०३(१) भा.न्या. सं. २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हयाची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त, परिमंडळ १, सहा. पोलीस आयुक्त तनवीर शेख व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत अदाटे यांनी तात्काळ घटनास्थळी भेटी दिल्या व तपास पथकाला गुन्हयाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करून आवश्यक त्या सुचना दिल्या. घटनास्थळी फॉरेन्सिक न्यायवैद्यकीय तज्ञ, फिंगरप्रिंट तज्ञ, शासकीय पंच यांच्या मदतीने घटनास्थळावरून भौतिक पुरावे गोळा करण्यात आले. तसेच पाहिजे आरोपीस अटक करून तात्काळ गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टिने ०४ तपास पथके तयार करण्यात आली. सदर पथकांनी गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टिने सभोवतालचे सी.सी.टि.व्ही. फुटेज व तांत्रिक विश्लेषण याचे आधारे साक्षीदार मिळवून आरोपी नामे आनंद पांडूरंग जाधव, वय ५२ वर्षे, राह.ठि. पी.डीमेलो रोड, फोर्ट मुंबई ४००००१ याला ताब्यात घेवून त्याचेकडे कौशल्यपूर्ण चौकशी करून त्याचा गुन्हयांतील सहभाग निश्चित करुन नमूद आरोपीस २४ तासात अटक करण्यात यश मिळवीले. आरोपीस मा. न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याची ०४ दिवस पोलीस कोठडी मंजूर केली आहे.

मा. पोलीस सह आयुक्त (का व सु) श्री. सत्य नारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग डॉ. अभिनव देशमुख, मा. पोलीस उपायुक्त गणेश गावडे, परिमंडळ १ (अति. कार्यभार ) यांचे मार्गदर्शना खाली आझाद मैदान पोलीस ठाण्याचे पोनि. नारायण पडवळ, सपोनि/शाह, सपोनि/पाटील, सपोनि/कलुबर्मे, पोउनि/ठेमस्कर, पोहवा/कटरे, पोहवा/पाटील यांनी सदरची उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे.